# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

क्र.एमपीआर/7750 दि. 09.08.2024

## - सूचनापत्र -

क्र. एमपीआर/3130 दि.11.08.2023 अन्वयेच्या जाहिरातीव्दारे, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील 'कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म)' या संवर्गातील 226 रिक्त पदे भरण्याकरीता दि. 22.12.2023 रोजी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा घेऊन, दि. 15.03.2024 रोजी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या निवडयादीमधील, मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या पडताळणी सापेक्ष निवड झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/Forprospects /Recruitment/Chief Personnel Officer या संकेतस्थळावर दि. **13.08.2024** रोजी उपस्थित राहण्याचे ई-मेलव्दारे, नोंदणीकृत टपालाव्दारे तसेच सूचना पत्र प्रसारित करुन निर्देश देण्यात आले आहेत.

**तथापि, सदर दिवशी खालील तक्ता-अ येथे नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांनी त्यांच्या सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रांच्या/प्रमाणपत्रांच्या पडताळणीकरीता खालील तक्त्यात नमुद केलेल्या वेळेस व दिनांकादिवशी उपस्थित रहावे. पडताळणीकरीता अनुपस्थित राहणा-या उमेदवारांचे नाव निवडयादीमधून कमी करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

तक्ता - अ

| अ.क्र. | उपस्थित रहावयाचे उमेदवार | उपस्थित रहावयाची वेळ व दिनांक | उपस्थितीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1. | वि जा (अ) प्रवर्ग निवड क्र. 240<br>विमाप्र प्रवर्ग निवड क्र. 281<br>अजा प्रवर्ग निवड क्र. 309, 321<br>भ ज (क) प्रवर्ग निवड क्र. 243<br>भ ज (ड) प्रवर्ग निवड क्र. 244<br>(सोबत यादी जोडण्यात येत आहे.) | दि. 13.08.2024 रोजी<br>सकाळी 11.00 ते 1.30 वाजेपर्यंत | प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय, सहावा मजला, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001. |

**कागदपत्रे पडताळणीकरीता उपस्थित राहणा-या उमेदवारांकरीता आवश्यक सूचना :**

1. सोबत जोडण्यात आलेल्या विहित नमुन्यातील अर्जामध्ये माहिती भरुन, सदर अर्ज सोबत आणणे आवश्यक आहे.
2. शालांत परीक्षा गुणपत्रक व शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3. शालांत परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4. सर्व सेमीस्टरच्या गुणपत्रिकांसह, पदवी परीक्षा गुणपत्रक व पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. महाविद्यालयाचे प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण प्रमाणपत्र तसेच टक्केवारी नमुद करणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
6. मराठी व इंग्रजी टंकलेखनाची विहित गतीची परीक्षा उत्तीर्ण असल्याचे शासनाचे व्यावसायिक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
7. मराठी व इंग्रजी लघुलेखनाची विहित गतीची परीक्षा उत्तीर्ण असल्याचे शासनाचे व्यावसायिक प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
8. 'एम.एस.सी.आय.टी' परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा शासन निर्णय क्र.मातंस/2012/प्र.क्र.277/39 दि.04.02.2013 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
9. सक्षम प्राधिका-यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
10. जन्मदिनांक समाविष्ट असलेले शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्मदाखला सादर करणे आवश्यक आहे.
11. 'कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म)' या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता प्रसारित केलेल्या क्र. एमपीआर/3130 दि.11.08.2023 अन्वयेच्या जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अर्हतेनुसार, उमेदवाराने धारण केलेल्या सर्व शैक्षणिक आणि इतर आवश्यक प्रमाणपत्रे तसेच सामाजिक आरक्षणांतर्गत आवश्यक असलेली **सर्व मूळ प्रमाणपत्रे** पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहेत.

12. समांतर आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या शासन निर्देशानुसार आवश्यक ती **सर्व मूळ प्रमाणपत्रे** सादर करणे आवश्यक आहे.

(महिला आरक्षण/माजी सैनिक/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/खेळाडू/अंशकालीन पदवीधर/ अनाथ/दिव्यांग)

13. अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासप्रवर्गातील उमेदवारांनी ते/त्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम प्राधिका-याचे सन 2023-24 या आर्थिक वर्षामध्ये वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
14. विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करणे आवश्यक आहे.
15. दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे सक्षम शासकीय प्राधिका-यांनी दिलेले ऑनलाईन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
16. **वर नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे / इतर आवश्यक कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह, साक्षांकीत प्रतींचा एक संच पडताळणी करीता सादर करणे आवश्यक आहेत.**
17. लेखनिकाची सुविधा घेतलेल्या दिव्यांग कर्मचा-यांनी लेखनिकाची शैक्षणिक पात्रता ही कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म) पदाच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा कमी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र त्यांच्या शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक आहे.
18. सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास, नियोक्त्याचे ना हरकत प्रमाणपत्र (प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी राजीनामा देणे आवश्यक राहील) सादर करणे आवश्यक आहे.
19. मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून इतर सर्व जिल्ह्यातील उमेदवारांनी पोलिस ना - हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणेकरीता आवश्यक असलेला संबंधित जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या कार्यालयाचा पत्ता सोबत आणणे आवश्यक आहे.
20. उपरोक्त बाबत काही शंका असल्यास दूरध्वनी क्र. 022-22620251 विस्तारीत क्र. 4610, 4626 वर संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| सही/- दि.09.08.2024 | - रजेवर - | सही/- दि.09.08.2024 |
| (तेजश्री कांबळे) | (स्वाती लळित) | (रिमा ढेकणे) |
| प्रशासकीय अधिकारी (एमपीआर) | सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (आस्थापना) प्र. | प्रमुख कर्मचारी अधिकारी |

**बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म) या पदाकरीता तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवडयादीमधील, गुणवत्तेनुसार येणा-या पुढील उमेदवारांच्या मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर कागदपत्रांच्या पडताळणीबाबत.**

| SR.NO | Merit No. | NAME | GENDER | CATEGORY | SELECTION |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 243 | RAJU ASHOK BANALE | M | NT-C | **NT-C-1** |
| 2 | 240 | NIRANJAN SUDHAKAR PAWAR | M | VJ-A | **VJ-A-1** |
| 3 | 281 | ROHIT LILADHAR AHIRE | M | SBC | **SBC-1** |
| 4 | 244 | PALVE PRATIKSHA DHANANJAY | F | NT-D | **NT-D-1** |
| 5 | 321 | DIGAMBAR ASHOK ZUNJARE | M | SC | **SC-1** |
| 6 | 309 | RAHUL SHARAN BALLARI | M | SC | **SC-2** |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म) पदाकरीता अर्जाचा नमूना

उमेदवाराने त्याचे अलिकडेच काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वत:ची स्वाक्षरी करावी.
2.5 से.मी. X 3 से.मी.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म) या पदाकरीता दि.11.08.2023 च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार उत्तीर्ण झालो असून, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि.16.03.2024 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवडयादीतील माझा गुणवत्ता क्र. _________ आहे.

1) (अ) ऑनलाईन अर्जाचा क्रमांक व दिनांक : ___________________________________

(ब) ऑनलाईन अर्जानुसार, संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) (मराठीत): _______________________________

(इंग्रजीत): ___________________________________

(क) विवाहित महिला असल्यास, लग्नापूर्वीचे नाव : ___________________________________

(ड) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव : श्री/श्रीम. ___________________________________

2) (अ) पत्रव्यवहाराचा पत्ता : ___________________________________
___________________________________
___________________________________

(ब) कायम पत्ता : ___________________________________
___________________________________
___________________________________

ई-मेल : ___________________________________

भ्रमणध्वनी क्र. : ___________________________________

3) लिंग : पुरूष ☐ स्त्री ☐ इतर ☐

4) (अ) उमेदवाराचा स्वत:चा जात प्रवर्गासमोर ( √ ) असे चिन्ह करा.

| अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(ब) उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमून केलेल्या जात प्रवर्गासमोर ( √ ) असे चिन्ह करा.

| अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | आदुघ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(ब) ऑन लाईन अर्जामध्ये समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास ( √ ) असे चिन्ह करा. त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

| महिला | माजी सैनिक | प्रकल्पग्रस्त | भूकंपग्रस्त | खेळाडू | अंशकालीन पदवीधर | अनाथ | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

5) जात/पोटजात/प्रवर्ग असल्यास : ___________________________________

जात प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक : _______________________________ प्रत जोडली - आहे / नाही.

जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक : _______________________________ प्रत जोडली - आहे / नाही

6) उमेदवार दिव्यांग आहे का ? असल्यास दिव्यांगत्वाचा प्रकार /प्रवर्गाच्या खालील रकान्यात ( √ ) असे चिन्ह करुन किमान 40% दिव्यांगत्वाचे सक्षम प्राधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.

| अ | ब | क | ड | ई |
|---|---|---|---|---|
| | | | | |

7) उन्नत व प्रगत गटात मोडत असल्यास, प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक : ______________________________

( अ.जा. व अ.ज. प्रवर्ग तसेच गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गात निवड झालेल्या महिला उमेदवार वगळून)

8) अ) जन्मदिनांक :

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

ब) ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळीचे वय :

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

9) अ) शैक्षणिक अर्हता :

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नाव | एकूण गुण/पैकी | टक्केवारी | खालील नमुद, 100 गुणांचा विषय घेऊन उत्तीर्ण आहे किंवा नाही | | आसन क्रमांक व उत्तीर्ण दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मराठी | इंग्रजी | |
| माध्यमिक शालांत परीक्षा किंवा तत्सम | | | | | | |
| पदवी परीक्षा किंवा तत्सम | | | | | | |
| अन उच्च शैक्षणिक अर्हता | | | | | | |

ब) मराठी टंकलेखन: ________________श.प्र.मि. मराठी लघुलेखन: ________________श.प्र.मि.

इंग्रजी टंकलेखन: ________________ श.प्र.मि. इंग्रजी लघुलेखन: ________________ श.प्र.मि.

**(ऑनलाईन अर्ज करावयाच्या अंतिम दिनांक 04.09.2023 पूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.)**

10) संगणक विषयक ज्ञान: एम.एस.सी.आय.टी ______________________________
किंवा शासनाने विहित केलेले संगणकविषयक अभ्यासक्रम ______________________________

11) अनुभव (असल्यास) ______________________________
(सुशिक्षित बेरोजगार असल्यास आवश्यक माहिती नमूद करावी.) ______________________________

12) (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? ______________________________

(ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद ______________________________

करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची ______________________________

प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. ______________________________

13) (अ) उमेदवाराविरूद्ध पोलीस चौकशी/न्यायालयीन ______________________________

प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का ? ______________________________

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा ______________________________

14) (अ) सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का ? _______________________________

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील देऊन _______________________________
सध्याच्या नियोक्त्याचे 'ना हरकत' प्रमाणपत्र जोडावे.

15) (अ) उमेदवार माजी सैनिक/खेळाडू आहे काय ? ______________________________

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा _______________________________

(माजी सैनिकांच्या बाबतीत डिस्चार्ज प्रमाणपत्राची प्रत जोडावी.) (खेळाडूंनी प्रमाणपत्र जोडावे.)

16) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आहे का ? ______________________________

असल्यास त्याची प्रत सोबत जोडावी.

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/ करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास तसेच उपरोक्त दिलेल्या माहितीच्या आधारे नियुक्ती झालेली असल्यास सेवेतून कमी केल्यास, त्याबाबत माझी तक्रार रहाणार नाही. अर्जाव्दारे दिलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यास बृहन्मुंबई महानगरपालिका माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाई करू शकते याची मला जाणीव आहे.

आपला / आपली विश्वासू,

दिनांक:

(अर्जदाराचे नाव)

सोबत: 1)

2)

3)

4)

5)

6)